# कोविड -१९ भरतीप्रक्रिया

## राष्ट्रीय आरोग्य अभियान

## जिल्हा एकात्मिक आरोग्य कुंटुब कल्याण सोसायटी,धुळे

राष्ट्रीय आरोग्य अभियान,धुळे **COVID - 19** या साथरोगाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने रिक्त असलेल्या पदांची पदभरती प्रक्रिया खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे कंत्राटी व करार पदध्तीने मानधन तत्वावर खालील पदांसाठी थेट मुलाखत आयोजीत करण्यात येत आहे.

| VACANT POST COVID-19 RECRUITMENT | | | | |
|---|---|---|---|---|
| **SR. NO.** | **POST NAME** | **EDUCATIONAL QUALIFICATION** | **SALARY** | **POST** |
| 1 | Physician | MD Medicine | 75000+performance | 2 |
| 2 | Medical Officer | MBBS | 60000 | 19 |
| 3 | AYUSH MO | BAMS/BUMS | 30000 | 8 |
| | **TOTAL** | | | **29** |

**अटी व शर्ती:-**

१) इच्छुक उमेदवारांची दि. ०७/०९/२०२० ते ११/०९/२०२० रोजी कार्यालयीन वेळेत राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय सामान्य रुग्णालय आवार धुळे येथे मुळ कागदपत्र व छायांकित प्रती सह उपस्थित रहावे.

२) पदासमोर नमुद मानधन हे एकत्रित मानधन असुन त्याव्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते देय राहणार नाही.

३) कोरोना विषाणु (**COVID - 19**) प्रादुर्भाव लक्षात घेता उद्रेक सदृश्य परिस्थिती हाताळण्यासाठी COVID Care Centre (CCC), Dedicated COVID Health Centre (DCHC), Dedicated COVID Hospital (DCH) या संस्थामध्ये सेवानिवृत्त कर्मचारी/अधिकारी यांची प्राधान्यक्रमाने नियुक्ती करण्यात येईल.

४) उपरोक्त पदांसाठी उपरोक्त जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या पदाकरीता अपेक्षित उमेदवार उपलब्ध न झाल्यास **COVID - 19** या साथरोगाच्या व्यवस्थापनाकरीता सदरील पदे भरणे आवश्यक असल्याने उक्त शैक्षणिक अर्हता धारक शासकीय सेवेतून सेवानिवृत्त उमेदवार हे सदर पदाकरीता पात्र राहातील.

५) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांचे दिनांक २५ एप्रिल २०१६ चे शासन निर्णयास अनुसरुन अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकास उमेदवाराचे किमान वय १८ वर्षे व कमाल वय खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे व मागासवर्गीय करीता ४३ वर्षे राहील. वैद्यकीय अधिकारी (एम.बी.बी.एस.) व विशेषज्ञांकरीता तसेच वैद्यकीय अधिकारी (बी.ए.एम.एस.) यांचे कमाल वय खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे व मागासवर्गीय करीता ४३ वर्षे राहील. तसेच सेवानिवृत्त वैद्यकीय अधिकारी यांची वयोमर्यादा ७० वर्षापेक्षा कमी असावी तसेच इतर पदांच्या सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांची सेवाप्रवेश व सेवासमात्पीची वयोमर्यादा ६५ वर्षे इतकी असुन, वय ६० किंवा त्यापेक्षा अधिक वयाच्या उमेदवारांनी जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडुन प्राप्त केलेले शारीरीकदृष्टा सक्षम असल्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील.

६) वरील सर्व पदे कंत्राटी स्वरुपाची व एकत्रित मानधनाची असून **COVID-19** या साथरोगाच्या कालावधी पुरताच असल्याने, साथ कमी झाल्यास किंवा रुग्णालयातील **COVID-19** उपचार कक्ष बंद झाल्यास सदरील नेमणुक आपोआप संपुष्टात येईल. त्यासाठी १ महिन्याची नोटीस दिली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

७) वरील नमुद पदे ही राज्य शासनाची पदे नसून निव्वळ कंत्राटी स्वरुपाची पदे आहेत. सदर पदावर शासकीय सेवेप्रमाणे असलेले नियम अटी व शर्ती याबाबतचा हक्क व दावा राहणार नाही तसेच या पदासाठी शासनाचे सेवा नियम लागू नाहीत.

८) अर्जदार हा संबधित पदासाठी शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणतेही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा. शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असल्याबाबतचे प्रमाणपत्र जिल्हा शल्य चिकित्सक यांचे मार्फत प्राप्त करुन घ्यावे.

९) कौन्सिलकडील नोंदणीबाबत अथवा इतर कोणत्याही कागदपत्रांची असलेली वैधता ही चालू कालावधीतील असावी. तथापी वैदय प्रमाणपत्र नसलेल्या उमेदवारांचा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

१०) अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्यांचे सोईनुसार ठिकाण बदलून मिळण्याची मागणी करता येणार नाही.

११) अर्जदारांनी आपल्या अर्जावर त्यांच्या सध्या सुरु असलेला मोबाईल नंबर व ई-मेल आयडी अचूक नोंदवावा. तसेच ते भरतीप्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सुस्थितीत राहील याची दक्षता घ्यावी.

१२) भरती प्रक्रिये दरम्यान ज्या-ज्या उमेदवारांना बोलविण्यात येईल, त्या-त्या वेळी त्यांना स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल. तसेच सदर उपस्थितीकरीता कोणतेही मानधन अथवा प्रवास खर्च देय राहणार नाही.

१३) मुलाखतीस उपस्थित राहतांना विहीत नमुन्यातील अर्जासोबत सर्व शैक्षणीक कागदपत्रे, वयाचा पुरावा, पदवी/पदविका शेवटच्या वर्षाची प्रमाणपत्र, गुणपत्रिका, कौन्सील रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र (As Applicable), शासकीय/निमशासकीय संस्थामध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र इत्याइी कागदपत्रे सादर करावी.

१४) निवड झालेल्या उमेदवारांना करारपत्रातील अटी मान्य असल्याबाबत रु.१००/- बॉन्ड पेपरवर करारनामा पदावर रुजू होताना सादर करावा लागेल.

१५) निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश मिळाल्यापासून ७ दिवसांमध्ये नियुक्तीचे ठिकाणी रुजू होणे बंधनकारक राहील अन्यथा त्यांची नियुक्ती आदेश संपुष्टात आणून, प्रतिक्षाधिन यादीतील पुढील उमेदवारांस नियुक्ती देण्यात येईल.

१६) उपरोक्त आवश्यक कागदपत्रांसह यशवंतराव चव्हाण सभागृह जिल्हा परिषद धुळे येथे उपस्थित रहावे.

१७) भरती प्रक्रियेच संपुर्ण अधिकारी, पदे कमी-जास्त करणे, भरती प्रक्रिया रद्द करणे, अटी व शर्तीमध्ये बदल करणे, पदस्थापनेच्या ठिकाणामध्ये बदल करणे, इत्यादी सर्व अधिकार हे या कार्यालयाचे असून निवड प्रकियेत कोणत्याही क्षणी बदल करण्याचे अधिकारी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परीषद,धुळे यांनी राखुन ठेवलेले आहेत. तसेच MBBS Medical Officer उपलब्ध न झाल्यास AYUSH MO ना प्राधान्य देण्यात येईल.

/- स्वाक्षरी,
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परीषद,धुळे

. .